प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

## संक्षिप्त



नाशिक : 'सतर्कता जागरुकता सप्ताह'निमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांसह मान्यवर.

# के. के. वाघ अभियांत्रिकीत स्पर्धेला प्रतिसाद

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात 'आयओसीएल' कंपनीतर्फे 'सतर्कता जागरुकता सप्ताह' उपक्रमास प्रारंभ करण्यात आला. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त येथे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 'देश भ्रष्टाचारमुक्त देश करणे' भ्रष्टाचाराची समाजाला जाणीव करून देऊन त्यापासून परावृत्त करणे हाच या सप्ताहाचा उद्देश आहे. 'राष्ट्राच्या समृद्धीसाठी अखंडतेची संस्कृती, सत्यनिष्ठा की संस्कृति से राष्ट्र की समृद्धी' हा होता. प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी 'आयओसीएल'चे मुख्य महाव्यवस्थापक गुरुराज के., समरेश कुमार, के. आर. करुणाकरण, लता मारू आणि किरण खैरनार यांचे स्वागत केले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी भ्रष्टाचारमुक्त भारत निर्माणाची प्रतिज्ञा घेतली. परीक्षक म्हणून प्रा. वर्षा तिडके व प्रा. स्नेहल जाधव यांनी काम पाहिले. स्पर्धेत २० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. साक्षी तिडकेने प्रथम क्रमांक मिळवला. लक्ष्मी अहिरे द्वितीय, तर श्रेया करोडेने तृतीय क्रमांक पटकावला. संस्थाध्यक्ष समीर वाघ, प्रा. के. एस. बंदी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Nashik Edition
Dec 06, 2024 Page No. 4
Powered by: erelego.com